पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४२१/२०१९
दिनांक : १३/०९/२०१९

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक **२०/०९/२०१९** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२०/०९/२०१९** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – **०७**

दिनांक : **२०/०९/२०१९** वेळ : दु.**३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२०/०९/२०१९** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक **०७/०९/२०१९** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक ०६**) सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) प्रभाग क्र.१७ मध्ये समक्ष स्थळ पाहणी केली असता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “ब” क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रभाग क्र.१७ या भागाचा समावेश होतो. सदर भागामध्ये नागरिकांसाठी व तरंगत्या लोकसंखेसाठी मनपाने विविध ठिकाणी सार्वजनिक स्वच्छता गृहांची व्यवस्था केली आहे. सदर स्वच्छतागृह दैनंदिन वापरामुळे ना दुरुस्त होतात. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता गृहे सुस्थितीत ठेवणे शहराच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रभाग क्र.१७ मध्ये सार्वजनिक शौचालये ०५ ब्लॉक (सिट्स ४०) इतके व ०४ युरिनल्स ब्लॉक्स आहेत. तसेच मनपाच्या शाळांमध्ये सुद्धा स्वच्छता गृहे आहेत. सदर स्वच्छता गृहांची कालबद्ध पद्धतीने दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर भागामध्ये विविध ठिकाणी राडारोडा पडलेला असतो त्याबाबत नागरिक व नगरसदस्यांच्या तक्रारी येतात त्याचे निराकरण करण्यासाठी राडारोडा उचलणे गरजेचे आहे. तसेच ज्याठिकाणी रस्त्यावरती कचरा पडतो (जीव्हीपी स्पॉट) त्या ठिकाणचे सुशोभिकरण करून नागरिकांना सदर ठिकाणी कचरा न टाकणेसाठी उद्युक्त करणे गरजेचे आहे. मनपाच्या मालमत्तांच्या सिमाभिंतींवर भितिचित्रे काढून पर्यावरण व स्वच्छते बाबत जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर कामाचा समावेश

सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेला आहे. अशी नागरिक व नगरसदस्यांची मागणी आहे. सदर कामाचा सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात समावेश करण्यात आलेला आहे. सार्वजनिक स्वच्छता गृहांची देखभाल दुरुस्तीची कामे विना विलंब करणे गरजेचे आहे.त्या करिता स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत असलेल्या सामुदायिक व सार्वजनिक शौचालय दुरूस्ती या लेखाशीर्षातून निविदा काढणे गरजेचे आहे. सदर कामासाठी सन २०१९-२० च्या मनपा अंदाजपत्रकामध्ये पान क्र.५१३ अ.क्र.०३ वर र.रू.५,००,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार समक्ष जागेवर पाहणी केली असता राज्यस्तरीय एस.एस.आर सन २०१८-१९ चे मंजुर दर पृथ्थकरणानुसार अंदाजपत्रक तयार केले असून निविदा र.रू.४१,४८,८५२/- इतकी येत आहे. सदर कामासाठी एकत्रित प्रशासकीय मान्यता ठरावात या कामाला प्रशासकीय मान्यता उपलब्ध नाही. सदर कामाला प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.४९,८६,३२९/- इतकी येत आहे. तरी सदर काम करणेस व त्यासाठी येणाऱ्या र.रु.४९,८६,३२९/- (अक्षरीर.रु.एकोणपन्नास लाख शहाऐंशी हजार तिनशे एकोणतीस फक्त) इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४२१/२०१९
दिनांक : १३/०९/२०१९ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.